**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०५ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. समृद्धी महामार्गाच्या, इगतपुरी ते आमणे या अखेरच्या टप्प्याचं, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन.
2. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, वृक्षारोपण आणि पर्यावरण विषयक कार्यक्रमांचं आयोजन, चंद्रपूर मध्ये, आज आणि उद्या राष्ट्रीय परिषद.
3. आदिशक्ती अभियानासाठी, येत्या १५ दिवसात ग्रामसमित्या स्थापन करण्याचे, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांचे निर्देश.
4. कौशल्य विकास मंत्री, मंगल प्रभात लोढा यांच्या उपस्थितीत, नागपूर विद्यापीठात, पंडित दीनदयाल उपाध्याय, रोजगार मेळावा संपन्न.

-----------------------------------------

**समृद्धी महामार्ग**

हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या, इगतपुरी ते आमणे या, ७५ किलोमीटरच्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज, इगतपुरी इथं झालं. उप-मुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. समृद्धी महामार्गाच्या या टप्प्यामुळे, नागपूर ते मुंबई हा प्रवास फक्त, आठ तासांत करता येणार आहे. नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांमधून जाणारा या शेवटचा टप्पा, सह्याद्रीच्या पर्वत रांगांमधून बोगदे आणि पुलांद्वारे पूर्ण केला आहे. यात जवळपास ११ किलोमीटर लांबीचे, पाच बोगदे असून, इगतपुरीतला १७ मीटरपेक्षा जास्त रुंद आणि, नऊ मीटरपेक्षा, जास्त उंचीचा बोगदा राज्यातला सर्वात लांब आणि रुंद बोगदा आहे. या बोगद्यात बसवलेल्या, 'जनरेशन व्हेइकल एक्सिट सिस्टम'चा वापर भारतात पहिल्यांदाच करण्यात आला आहे.

-----------------------------------------

**'शिक्षण आणि क्रीडा -11 वर्ष**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी, गेल्या

**अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख सादर करत आहे. त्यात आज, शिक्षण आणि क्रीडा, भारताची अमृत पीढी म्हणजे, तरुण पिढीला सक्षम बनविण्याची गुरुकिल्ली, यावर आधारित हे वृत्त, देत आहेत, वृत्त विभागातून हेमांगी कुळकर्णी.......**

***(होल्ड बाईट)***

***भारताची दोन तृतीयांश लोकसंख्या** 35 **वर्षांखालील आहे ज्यामुळे, देशाला एक 'तरुण राष्ट्र' म्हणून ओळख मिळाली आहे. या तरुणाईच्या सामर्थ्यावर आधारित, भारत सरकार शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात, महत्त्वपूर्ण पायाभूत बदल करत आहे जे, भविष्यातील भारताच्या प्रगतीचा पाया घडवतात. राष्ट्रीय शिक्षण धोरण-** 2020 N.E.P. 2020 **अंतर्गत, सरकारनं** 2030 **पर्यंत शालेय-पूर्व ते माध्यमिक स्तरापर्यंत** 100% **नोंदणी आणि** 2035 **पर्यंत, उच्च शिक्षणात** 50% **नोंदणी साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलं आहे. या धोरणात समावेशक, बहुविषयक आणि लवचिक अभ्यासक्रम, व्यावसायिक शिक्षणाचा समावेश आणि बहुप्रवेश आणि निर्गमन प्रणाली यांचा समावेश आहे. 'खेलो इंडिया' कार्यक्रमाच्या अंतर्गत, देशभरात एक हजारपेक्षा अधिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली असून, ज्यात तरुण खेळाडूंना व्यावसायिक प्रशिक्षण, आधुनिक उपकरणे आणि तज्ञ प्रशिक्षकांची सुविधा दिली जाते. 'टार्गेट ऑलिंपिक पोडियम योजना'** (TOPS) **अंतर्गत, भारतातील अव्वल खेळाडूंना प्रशिक्षण, उपकरणे आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागासाठी आर्थिक मदत दिली जाते. या प्रयत्नांमुळे, गेल्या दोन ऑलिंपिकमध्ये भारताने तेरा पदकं जिंकली तर, पॅरालिंपिक मध्ये विक्रमी** 29 **पदके मिळवली आहेत. भारत सरकारच्या शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील या महत्त्वाकांक्षी उपक्रमांमुळे, देशातील तरुणाईला केवळ वाचन-लेखनाचे शिक्षणच नव्हे, तर मोठी स्वप्ने पाहण्याची, वेगाने धावण्याची आणि कधीही न थांबण्याची प्रेरणा मिळत आहे. या प्रयत्नांमुळे, भारताचे भवितव्य अधिक उज्ज्वल आणि सामर्थ्यवान होत आहे.***

------------------------------------------

**पर्यावरण दिन- राष्ट्रीय**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, जागतिक पर्यावरण दिना निमित्त, नवी दिल्लीतील, भगवान महावीर वनस्थळी पार्क इथं, वृक्षारोपण केलं. एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत, मोदी यांनी, अरवली ग्रीन वॉल प्रकल्पाचा एक भाग म्हणून, हे रोप लावलं. आजचे वृक्षारोपण अरवली पर्वत रांगांच्या ७००**

किलोमीटरच्या भागात, वनीकरण करण्याचं उद्दिष्ट असलेल्या, अरवली ग्रीन वॉल प्रकल्पाचा भाग आहे. याप्रसंगी, पंतप्रधान मोदींनी, दिल्ली सरकारच्या शाश्वत वाहतूक उपक्रमांतर्गत, २०० इलेक्ट्रिक बसना, हिरवी झेंडी दाखवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासकीय निवास स्थानी आज सिंदूरचं रोपटं लावलं. १९७१च्या युद्धात, साहस आणि पराक्रमाचं, अद्भुत उदाहरण, देशासमोर ठेवलेल्या, कच्छ इथला वीरांगना माता-भगिनींनी, नुकतीच पंतप्रधानांची भेट घेऊन, सिंदूरचं हे रोप त्यांना भेट म्हणून दिलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर आज, बृहन्मुंबई मनपा आणि, भा.म.ला. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं, वातावरण बदलाच्या जनजागृतीसाठी, जागतिक प्रचार मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. राज्य सरकारच्या दहा कोटी, वृक्ष लागवड मोहिमेत, नागरिकांनी सहभागी होण्याचं, त्यांनी आवाहन केलं.

---------------------------------------

पर्यावरण दिन-विदर्भ

आज सर्वच क्षेत्रात महिला नेतृत्व करीत असून, राज्यातील तीन मुख्य विभागांचे नेतृत्व, महिलांकडे आहे. महिलांच्या कार्य-कर्तृत्वामुळे राज्य प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यात वन क्षेत्रही मागे नाही. या क्षेत्रात, महिलांचे नेतृत्व वाढवून, बळकटी साधण्यासाठी आता, वन क्षेत्रात महिला कर्मचा-यांची संख्या वाढविली जाईल अशी घोषणा, राज्याचे वन मंत्री, गणेश नाईक यांनी केली. महाराष्ट्र राज्य वन विभागाद्वारे वनक्षेत्रातील महिला या विषयावर चंद्रपूर वन प्रशासन विकास आणि व्यवस्थापन प्रबोधिनी इथं आयोजित, 'वनशक्ती २०२५' या, वन क्षेत्रातील महिलांच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी ताडोबा इथं जागतिक दर्जाच्या रेस्टहाऊस प्रकल्पाची माहिती दिली-

*(होल्ड बाईट - गणेश नाईक २४ सेकंद)*

*ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, वहां पे खुटवांडा, भद्रावती गेट डिसाइड किया है कि कोर के बाद में बफर के बाहर फाइव स्टार होटल को भी परमिशन देने की भूमिका फॉरेस्ट डिपार्टमेंटने ली, और जरूरत पड़े तो इंटरनेशनल जो चेन्स ऑफ़ दी होटल है वो लोगों को इन्व्हाईट करके वो लोगों को होटल डालने के लिए भी हम बताएंगे। गेट पे इतना इंटरनेशनल स्टैंडर्ड का वहाँ पे रेस्ट हाऊस बनेगा)*

भारत सरकारच्या सूचना आणि प्रसारण मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय संचार ब्युरो आणि क्षेत्रीय कार्यालय नागपूर, महाराष्ट्र, नागपूर महामेट्रो, अनविती फाउंडेशन, झंकार महिला मंडळ (WCL), एस.व्ही.के. शिक्षण संस्था, आशा-किरण बालगृह, सृजन लोकविकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमानं, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, वृक्षारोपण आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होते. खापरी मेट्रो स्टेशन परिसर इथं मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आलं. तसंच जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, चित्रकला स्पर्धेचे देखील आयोजन, नागपुरातील झिरो माईल मेट्रो-स्टेशन, सीताबर्डी, नागपूर इथं करण्यात आलं. नागपूर मनपा आणि यु.सी.एन. केबल नेटवर्क यांचा संयुक्त विद्यमानं, महेश चौक, ट्रॅफिक पार्कजवळ प्लास्टिक पासून पृथ्वीला होणारा धोका या संकल्पनेवर आधारित 'पृथ्वी' शिल्प उभारण्यात आलं. विशेष म्हणजे हे शिल्प 'टाकाऊ प्लास्टिक बाटलीं'पासून तयार करण्यात आले आहे. बॉटलच्या आकाराचे हे शिल्प नागरिकांना 'पृथ्वीला प्लास्टिकमुळे उद्‌भवणाऱ्या धोक्यापासून सावध राहण्याची गरज' दर्शविते. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्यसाधून नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते या शिल्पाचे अनावरण करण्यात आले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल अकादमीने संचालक डॉ.हरिओम गांधी यांच्या नेतृत्वाखाली एक व्यापक वृक्षारोपण मोहीम आज आयोजित केली. प्लेटिना हॉस्पिटल नागपूर आणि आकाशवाणी नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज आकाशवाणी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त अमरावती जिल्हयातील प्रत्येकाने आपल्या घरासमोर आईच्या नावाने एक झाड लावण्याचे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. या पार्श्वभूमीवर आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत त्यांच्या आईच्या नावे पिंपळाचे रोप लावून वृक्षारोपण केले.

---------------------------------------

आदिशक्ती अभियान

महिला सक्षमीकरणाच्या उद्देशानं, राज्यभरात राबवण्यात येणारं, आदिशक्ती अभियान यशस्वी करण्यासाठी, १५ दिवसांत, ग्राम स्तरीय समित्या स्थापन करण्याचे निर्देश, महिला आणि बालविकास मंत्री, आदिती तटकरे यांनी दिले आहेत. आदिशक्ती अभियान आणि आदिशक्ती पुरस्कारा संदर्भात, मुंबईत

आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. या अभियाना अंतर्गत, महिलांच्या समस्या निवारणासाठी गाव, तालुका, आणि राज्य स्तरावर विविध समित्या स्थापन करण्यात येणार आहेत.

----------------------------------------

मंगल प्रभात लोढा

आपणास देण्यात आलेले कोणतेही काम श्रेष्ठपणे करणे हेच गीतेतील सर्वात मोठे ज्ञान असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री, मंगल प्रभात लोढा यांनी केले. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा रोजगार आणि प्रशिक्षण विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराज बाग चौक स्थित विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात आज रोजी रोजगार मेळावा पार पडला. यावेळी मंत्री, मंगल प्रभात लोढा मार्गदर्शन करीत होते. उद्योजकांनी विद्यार्थ्यांना कौशल्य युक्त बनविले पाहिजे असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावतीनं मंत्री लोढा यांनी केले. विद्यार्थ्यांना कौशल्य युक्त केले तर यांच्यामधून मोठे उद्योजक तयार होतील आणि भारत विकसित होईल असं लोढा म्हणाले.

----------------------------------------